मुद्रा यशोगाथा
नाव :- श्रीम.साधना रमेश पाटील, जि.चंद्रपूर
व्यवसाय :- शिलाई मशिनधारक

पंतप्रधान मुद्रा बँक योजनेमुळे शिलाई कामाच्या धंदयात वाढ करता आली.

लाभार्थ्यांचे मनोगत :- माझे पती ॲटो चालवितात, मुलाचे लग्न झाल्यानंतर मला देखील पतीप्रमाणे काही व्यवसाय करावा असे वाटायला लागले. त्यामुळे आधी परिसरातील महिलांच्या ब्लॉऊज सिलाई व पिकोफॉल करण्याचे काम सुरु होतेच. त्याला आणखी वाढविण्याचे मनात आले. बचत गटाच्या माध्यमातून अनेक काम सुरु असतांना घरामध्ये आर्थिक मदतीसाठी आणखी काही करता येईल का ? असा विचार सुरु झाला. पती ॲटो चालवितात, मुलगाही व्यवसाय करतो. सून सुध्दा माझ्या मदतीला आली. त्यामुळे आता व्यवसाय वाढविण्याचे मनात आले. मोठया प्रमाणात महिलांकडून ड्रेस मटेरियल शिवण्यासाठी येत होते. त्यामुळे साडयांना पिकोफॉल व ब्लॉऊज शिवण्याचा व्यवसाय अधिक प्रमाणात करण्याचे ठरले. त्यासाठी अडचण होती. आणखी एका शिलाई मशीनची अशातच मुद्रा बँक लोनबद्दल बचत गटाच्या माध्यमातून माहिती मिळाली. आणि बँकेकडे याबाबत विचारणा केली. बँकेने मला ५० हजार रुपयांचे लोन मंजूर केले. मी त्याची नियमित परतफेड करीत असून लोन मिळाल्यामुळे पतीप्रमाणेच मी देखील घर चालविण्यामध्ये हातभार लावत असून यासाठी सूनही मदत करीत असल्याचा मला आनंद आहे. मुद्रा बँक योजनेमुळे हे सर्व शक्य झाले आहे.

----------------